# जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे यांचे कार्यालय

**गांवदेवी भाजी मंडई इमारत, पहिला मजला, गांवदेवी मंदिराशेजारी,**
**स्टेशन रोड, ठाणे (प.) ४०० ६०२**

**दुरध्वनी क्र. २५३३१४८६** **ई-मेल आयडी : ddr.thane@gov.in**

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये आदेश

जा.क्र.जिउनि/ठाणे/बी-६/क.८८/आदेश/शताब्दी म.सह. बँक / १८३५ / सन २०१८
दिनांक :- १८/०४/२०१८

**वाचावे** :- १) महाराष्ट्र सहाकरी संस्था अधिनियम १९६०(सुधारणा २०१३) चे कलम ८३(१)मधील तरतूद
२) संस्थेने उपनिबंधक, सहकारी संसथा, ठाणे शहर, ठाणे यांचे कार्यालयात दाखल केलेले कायदा कलम १०१ ची प्रकरणे
३) संस्थेने मा. विभागीय सहबिनंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग, नवी मुंबई यांच्या कार्यालयात दाखल केलेले पुनर्निरीक्षण अर्ज
४) मा. विभागीय सहबिनंधक, सहकारी संस्था,कोकण विभाग,नवी मुंबई यांनी अमान्य केलेले पुनर्निरीक्षण अर्ज / आदेश
५) या कार्यालयाचे आदेश जा.क्र.जिउनि/ठाणे/बी-६/क.८३/शताब्दी म.सह. बँक/७२२९/सन २०१६, दिनांक २२/०९/२०१६ रोजीचे आदेश
६) चौकशी अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,अंबरनाथ यांचे जा.क्र.सनि/अंबरनाथ/बी-४/ शताब्दी महिला/का.क.८३/ले.प./२४८५, दिनांक ०९/११/२०१६ रोजीचे पत्र या कार्यालयास प्राप्त दिनांक १९/११/२०१६
७) या कार्यालयाचे जा.क्र.जिउनि/ठाणे/बी-६/क.८८/आदेश/शताब्दी म.सह. बँक/८८२०/सन २०१६, दिनांक २२/११/२०१६ रोजीचे फेरआदेश
८) श्री. एस. एस. तोटे, चौकशी अधिकारी यांनी दिनांक ३१/०३/२०१७ रोजी या कार्यालयास सादर केलेला चौकशी अहवाल

ज्याअर्थी, शताब्दी महिला सहकारी बँक लि. ठाणे शॉप क्र. ३/४, लक्ष्मी पॅलेस, गोडबोले हॉस्पिटल समोर, नौपाडा, ठाणे (प.) ता.जि. ठाणे या बँकेचे नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत झालेली असून सदरची बँक या कार्यालयाच्या अधिकार कक्षेत येते. आणि,

ज्याअर्थी, शताब्दी महिला सहकारी बँक लि. ठाणे शॉप क्र. ३/४, लक्ष्मी पॅलेस, गोडबोले हॉस्पिटल समोर, नौपाडा, ठाणे (प.) ता.जि. ठाणे (यापुढे बँक असे वाचावे) या बँकेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० (यापुढे कायदा कलम असे वाचावे), महाराष्ट्र सहकारी संस्थांचे नियम १९६१ (यापुढे नियम असे वाचावे), संस्थेचे नोंदणीकृत उपविधी व शासन वेळोवेळी निर्गमित करीत असलेल्या परिपत्रकाप्रमाणे चालविणे अनिवार्य आहे. आणि,

ज्याअर्थी, बॅकेने उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे शहर यांचे कार्यालयात दाखल केलेल्या कायदा कलम १०१ च्या अर्ज प्रकरणांवर त्यांनी दिलेल्या आदेशाचे विरुध्द बँकेने मा. विभागीय सहबिनंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग, नवी मुंबई यांचेकडे दाखल केलेल्या पुनर्निरीक्षण अर्ज क्र. ११०/१४, १११/१४, ११२/१४, ११३/१४, ११४/१४, ११६/१४, ११८/१४, ११९/१४, १२०/१४, १२१/१४ व १२२/१४ अर्ज अमान्य केलेले आहेत. आणि,

Scanned by CamScanner

ज्याअर्थी, श्री. एस. एस. तोटे, सेवानिवृत्त जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी सं (पदूम) ठाणे चौकशी अधिकारी यांनी त्यांचा चौकशी अहवाल दिनांक ३१/०३/२०७ रोजी या कार्याल सादर केला आहे. सदर चौकशी अहवालाचे अवलोकन केले असता अहवालात ११ कर्जदारांवर मु रक्कम रुपये ६७,३९,९४५/-, व्याज रक्कम रुपये ६७,०२,५४६/- असे एकूण रक्कम रु १,३४,४२,४९१/- थकीत येणे बाकी असल्याचे दिसून येते. त्यातील काही कर्जदार सभासद म्ह दाखल होण्यापूर्वी त्यांना कर्ज मंजूर करण्यात आले आहे. म्हणजे सदर कर्ज बिगर सभासदांना मं झाल्याचे दिसते. यावरुन बँकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे प्रथम दर्शन दिसून येत आहे. आणि,

ज्याअर्थी, शताब्दी महिला सहकारी बँक लि. ठाणे या बँकेचे येणे देणे व्यवहारासह सिटीझन्स को-ऑप. बँक लि., राजकोट (मल्टी स्टेट बँक) या बँकेत विलिनीकरण झालेले आहे. त्य मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे व रिझर्व्ह बँक ऑफ इंडि यांची मान्यता आहे व विलिनीकरण अटीमध्ये नमूद केल्याप्रमाणे " बँकेच्या कोणत्याही व्यवहारापो करण्यात येणाऱ्या न्यायालयीन प्रकियेस बाधा येणार नाही. तसेच निबंधक, न्यायालय, प्राधिकर यांचेव्दारे विलिनीकरण करण्यात आलेल्या बँकेचे कर्जदार, अधिकारी, कर्मचारी अथवा संचालक यांचे कार्यवाही करण्यास हक्कदार असेल. " त्यामुळे शताब्दी महिला सहकारी बँक लि. ठाणे या बँके सिटीझन्स को-ऑप. बँक लि., राजकोट (मल्टी स्टेट बँक) या बँकेत विलिनीकरण झालेले असले त नुकसानीची जबाबदारी टाळता येत नाही. आणि,

त्याअर्थी, चौकशी अधिकारी यांनी अहवालात दिलेल्या अभिप्रायानुसार शताब्दी महि सहकारी बँक लि. ठाणे बँकेच्या आर्थिक नुकसानीस बँकेचे माजी संचालक मंडळ व व्यवस्थापक वैयक्तिक व सामुहिकरित्या जबाबदार आहेत. बँकेच्या आर्थिक नुकसानीस जबाबदार असणाऱ्या व्यक्तीं जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे असे माझे मत झाले असून नुकसानीची जबाबदारी निश्चि करणेसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० (सुधारित अधिनियम २०१३) चे कलम ८८ अन्व आदेश देणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे. आणि,

त्याअर्थी, खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

## :- आदेश -:

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ (सुधारीत अधिनियम २०१ चे कलम ८८ अन्वये मला प्राप्त अधिकारानुसार मी, एस. एम. पाटील, जिल्हा उपनिबंधक, सहकार

Scanned by CamScanner

समोर,नौपाडा, ठाणे (प.) ता.जि. ठाणे **सद्या विलिनीकरण सिटीझन्स को-ऑप. बँक लि., राजकोट (मल्टी स्टेट बँक)** या बँकेच्या सोबतच्या परिशिष्टाप्रमाणे बँकेच्या माजी संचालक मंडळ व व्यवस्थापक यांच्या सहभागानुसार आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करणेसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशी आदेशीत करीत आहे. या चौकशीसाठी डॉ. अर्चना शिंदे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (२), ठाणे यांना चौकशी अधिकारी म्हणून या आदेशाव्दारे प्राधिकृत करीत असून त्यांनी ०६ महिन्यांत चौकशी पूर्ण करावी.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये या चौकशीच्या खर्चासाठी रुपये २०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये वीस हजार मात्र) मंजूर करीत आहे. सदर रक्कमेचा धनादेश संदर्भिय बँकेने १० दिवसांत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे यांचे खाती जमा करावा.

उपरोक्त आदेश आज दिनांक १९/०४/२०१८ रोजी माझी सही व या कार्यालयाच्या मुद्रेसह निर्गमित केला असे.

**ठिकाण :- ठाणे .**
**दिनांक :- १९/०४/२०१८**

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था ठाणे

**( एस. एम. पाटील )**
**जिल्हा निबंधक,**
**सहकारी संस्था, ठाणे**

**प्रत माहितीसाठी व आवश्यक त्या रवाना**

Scanned by CamScanner